**ठळक बातम्या**

- 'नारी शक्ती सह विकसित भारत' या संकल्पनेवर आधारित यंदाचा महिला दिन साजरा करण्यात येणार, राज्यातही विविध कार्यक्रमांचं आयोजन

- धान आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यासाठी सकारात्मक असल्याचं सरकारचं विधानसभेत आश्वासन

- राज्यात पवित्र पोर्टलच्या माध्यमातून शिक्षकांची कोणतीही चुकीची भर्ती झालेली नसल्याचं शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांचं विधान परिषदेत

**आणि**

- सांगली कृषी उत्पन्न बाजार समितीत हळदीला उच्चांकी भाव

**<><><><><>**

'नारी शक्ती सह विकसित भारत' या संकल्पनेवर आधारित यंदाचा महिला दिन साजरा करण्यात येणार असल्याची घोषणा केंद्रीय महिला आणि बालकल्याण मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी आज केली. या निमित्ताने नवी दिल्ली इथं विज्ञान भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत एका परिसंवादाचं आयोजनही करण्यात आल्याचं त्यांनी व्हिडीओ संदेशात म्हटलं आहे. महिलांनी आर्थिक, सामाजिक, राजकीय, राष्ट्रीय तसंच वांशिक, भाषिक आणि सांस्कृतिक सीमा ओलांडून दाखवलेल्या कर्तृत्वाचा गौरव करण्यासाठी यंदा या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. सरकार

विविध धोरणं आणि योजनांच्या माध्यमातून महिला सबलीकरण आणि लिंगभाव समानतेसाठी काम करत असल्याचंही त्या म्हणाल्या.

महिला दिनानिमित्त राज्यातही विविध कार्यक्रमांच आयोजन करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रात धान आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यासाठी सरकार सकारात्मक असून मंत्रिमंडळ बैठकीत याबाबत निर्णय घेतला जाईल, असं कृषी राज्यमंत्री आशीष जयस्वाल यांनी विधानसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं. आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी याबाबत प्रश्न विचारला होता. नगरपालिका, नगरपंचायत क्षेत्रातल्या शेतकऱ्यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेचा लाभ देण्याची मागणी आमदार बाबासाहेब देशमुख यांनी केली. यावर तपासून कार्यवाही करण्याचं आश्वासन कृषी मंत्र्यांनी दिलं.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह भैय्याजी जोशी यांच्या वक्तव्याचा मुद्दा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते भास्कर जाधव यांनी उपस्थित केला. भैयाजी जोशी यांनी मुंबईत मराठी येणं आवश्यक नसल्याचं वक्तव्याचा उल्लेख करत सरकारची याबाबत भूमिका काय आहे असा प्रश्न त्यांनी विचारला. यावर मुंबई आणि महाराष्ट्राची भाषा मराठीच असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं. यानंतर आदित्य ठाकरे याच विषयावर बोलायला उभे राहिले असता सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी आक्षेप घेतला. त्यामुळे सभागृहात काही वेळ गोंधळाचं वातावरण निर्माण झालं.

घाटकोपर पश्चिम मतदारसंघाचे आमदार राम कदम यांनी भैय्याजी जोशी यांच्या वक्तव्याचा विपर्यास केला गेल्याचं सांगितलं. ते म्हणाले..

**होल्ड बाईट - राम कदम**

मंत्री जयकुमार गोरे यांनी दैनिक सामनाचे कार्यकारी संपादक संजय राऊत, आमदार रोहित पवार आणि यूट्यूबर तुषार खरात यांच्यावर हक्कभंगाचा प्रस्ताव मांडला. या तिघांनी आपल्याविषयी अश्लील टिप्पणी केली असून यामुळे आपली बदनामी झाल्याचं गोरे म्हणाले. हा प्रस्ताव हक्कभंग समितीकडे पाठवल्याचं विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे वरिष्ठ नेते भय्याजी जोशी यांनी मराठी भाषेचा अपमान केल्याचा आरोप करत विधानपरिषदेत विरोधक आक्रमक झाले आणि त्यांनी सभात्याग केला.

महाराष्ट्रात राहणाऱ्या प्रत्येकाला मराठी भाषा आली पाहिजे ,शिकली पाहिजे आणि शिक्षणही मराठीत घेतलं पाहिजे हीच राज्य सरकारची भूमिका आहे, असं मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं. भय्याजी जोशी यांच्या वक्तव्याचा विपर्यास झाल्याचं ते म्हणाले. मात्र विरोधकांचं समाधान झालं नाही. भय्याजी जोशी यांनी माफी मागावी आणि राज्य सरकारनं याचा निषेध करावा अशी मागणी विरोधकांनी केली.

**<><><><><>**

मुंबईत मराठी भाषा येणं गरजेचं नाही, हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा अजेंडा असून केवळ फूट पाडण्यासाठी हा मुद्दा वापरला जात असल्याचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला आहे. याप्रकरणी महाविकास आघाडीच्या आमदारांनी हुतात्मा स्मारकाला अभिवादन करुन आंदोलन केलं.

भैयाजी जोशी यांनी मराठीचं महत्त्व कमी करण्याच्या उद्देशाने जाणीवपूर्वक हे वक्तव्य केलं असल्याचा आरोप प्रदेश काँग्रेसने केला आहे. याकरता जोशी यांच्याकडून जाहीर माफीची मागणी प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केली आहे.

**<><><><><>**

विधानपरिषदेत सकाळच्या विशेष सत्रात आज राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार व्यक्त करणाऱ्या प्रस्तावावर चर्चा सुरु झाली. भाजपा गटनेते प्रवीण दरेकर यांनी या चर्चेची सुरुवात केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारचा रोडमॅप राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये प्रतिबिंबित झाला आहे. महायुती सरकार सर्व समाजघटकांना न्याय देणारं असल्यामुळे जनतेनं विश्वासानं पुन्हा महायुती सरकारला निवडून दिलं, असं ते म्हणाले. इमारतींच्या स्वयंपुनर्विकासासाठी स्वतंत्र गृह वित्तपुरवठा महामंडळ स्थापन करण्याची मागणी त्यांनी केली.
राज्यपालांच्या अभिभाषणात केवळ घोषणांचा पाऊस असून 'कुठे नेवून ठेवलाय महाराष्ट्र' अशी राज्याची स्थिती आहे अशी टीका विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी विधानपरिषदेत केली. राज्यात कायदा आणि

सुव्यवस्थेची , आरोग्याची आणि शेतकऱ्यांची स्थिती गंभीर आहे. राज्याची आर्थिक स्थिती आणि प्रशासन कोलमडलं असल्याची टीका त्यांनी केली.

<><><><><>

राज्यात पवित्र पोर्टलच्या माध्यमातून शिक्षकांची कोणतीही चुकीची भर्ती झालेली नाही असं शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी आज विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात स्पष्ट केलं. पवित्र पोर्टलच्या माध्यमातून भर्ती करण्यात आलेल्या शिक्षकांच्या इतर माध्यमांच्या शाळेमध्ये नियुक्ती केल्याबाबतचा तारांकित प्रश्न राष्ट्रवादी काँग्रेसचे इद्रिस नायकवडी यांनी उपस्थित केला होता, त्याला भुसे यांनी उत्तर दिलं.

खाजगी अनुदानित शाळांमधील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहाव्या आणि सातव्या वेतन आयोगाचे थकीत हप्ते देण्याची कार्यवाही लवकरच पूर्ण करण्यात येईल अशी ग्वाही भुसे यांनी दिली. अमरावती विभागातल्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहाव्या वेतन आयोगाचे प्रलंबित हप्ते अदा करण्याबाबतचा प्रश्न काँग्रेसचे अभिजित वंजारी यांनी विचारला होता. त्याला उत्तर देताना भुसे यांनी हे हप्ते येत्या ३१ तारखेपर्यंत दिले जातील असं आश्वस्त केलं.

शालेय शिक्षण विभाग संपूर्ण डिजिटल करण्याचा प्रयत्न असून  ऑनलाइन निवृत्तिवेतन व्यवस्था प्रगतीपथावर असल्याचं भुसे यांनी सांगितलं.

<><><><><>

कंपन्यांकडून होणारी गुंतवणूकदारांची फसवणूक टाळण्यासाठी राज्यात आर्थिक गुप्तवार्ता विभाग सुरू करण्यात येईल, अशी माहिती गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानपरिषदेत लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना दिली.

टोरेस कंपनीकडून झालेल्या गुंतवणूकदारांच्या फसवणुकीबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसचे विक्रम काळे यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेला ते उत्तर देत होते. हा विभाग फसवणुकीचे गुन्हे टाळण्यासाठी बारकाईनं लक्ष ठेवेल असं ते म्हणाले.

<><><><><>

सांगली कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात काल (बुधवारी) काढण्यात आलेल्या सौद्यात राजपुरी हळदीला 30 हजार रुपये प्रति क्विंटल भाव मिळाला आहे. 'यावर्षी हळद उत्पादन क्षेत्रात अतिवृष्टीसह तसंच अन्य कारणामुळ पीक कमी असल्यानं उत्पादन कमी होत असून हळदीला चांगला भाव मिळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त हळद विक्रीसाठी आणावी' असं आवाहन बाजार समितीनं केलं आहे.

<><><><><>

उपराष्ट्रपती जगदीप धनखड आज मुंबई दौऱ्यावर येणार आहेत. मुंबईत रॉयल ऑपेरा हाऊस इथं आयोजित मुरली देवरा स्मृती संवाद कार्यक्रमाला ते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील.

<><><><><>

काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी आज मुंबईच्या दौऱ्यावर आहेत. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी राहुल गांधी यांचं मुंबई विमानतळावर पुष्पगुच्छ देऊन स्वागत केलं. यावेळी खासदार वर्षा गायकवाड,आमदार विजय वडेट्टीवार, आमदार सतेज पाटील यांच्यासह काँग्रेसचे नेते, पदाधिकारी उपस्थित होते.

**<><><><><>**

माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं आयोजित केलेल्या वेव्ज इंडिया २०२५ या कार्यक्रमांतर्गत मनोरंजन आणि माध्यम क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी वेव्ज बाजार हे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आलं आहे. या उपक्रमांतर्गत चित्रपट, टीव्ही, ॲनिमेशन, गेमिंग, जाहिरात, संगीत दिग्दर्शन, रेडिओ यांसह माध्यमांच्या विविध प्रकारांना थेट बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात येणार आहे. जाहिरात किंवा चित्रपटांचे निर्माते, गेम डेव्हलपर आदींसाठी या उपक्रमाच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य मिळू शकणार आहे.

**//<><><><><>//**